उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर
महानगरपालिका मुख्यालय, उल्हासनगर-४२१००३
moh.umc2@gmail.com

दि. ०७/०६/२०२२

# प्रेसनोट

उल्हासनगर महानगरपालिकेचे प्रशासक तथा आयुक्त डॉ. राजा दयानिधी व अतिरिक्त आयुक्त डॉ. करुणा जुईकर, उप-आयुक्त (पर्यावरण) डॉ. सुभाष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरण विभागाच्या विभागप्रमुख श्रीम. विशाखा सावंत, लिपीक श्री. सयाजी घाटविसावे यांच्या नियोजनानुसार दिनांक ३ जुन, २०२२ रोजी जागतिक सायकल दिनानिमित्त महापालिका मुख्यालयापासुन गोल मैदान व शहाड स्टेशन पासुन परत महापालिका मुख्यालय या मार्गावरून पर्यावरण जनजागृतीकरीता सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

सदर सायकल रॅलीमध्ये २० सायकली, ०१ उदघोषण वाहनरिक्षा, ०१ ॲम्बयुलन्स व ०१ महापालिकेची गाडी असा ताफा होता. सायकल रॅलीद्वारे शहरातील नागरीकांना आपल्या शहरातील हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी तसेच पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी खाजगी वाहनांचा वापर कमीत कमी करावा आणि सार्वजनिक वाहनांचा वापर वाढवावा तसेच आठवडयातुन किमान एकदातरी किंवा कमीत कमी अंतराचा प्रवास करणेसाठी सायकलचा वापर करावा असे आवाहन करण्यात आले आहे.

सदर सायकल रॅलीमध्ये महापालिकेतील पर्यावरण विभागातील कर्मचारी तसेच श्रीम. प्राजक्ता कुलकर्णी, महापालिका सचिव, श्री. बाळू नेटके, मुख्य अग्निशमन अधिकारी/ मुख्य सुरक्षा अधिकारी व इतर सर्व विभागातील अधिकारी/कर्मचारी सहभागी झाले होते. त्याचप्रमाणे पर्यावरण विभागाकडील परिपत्रकाद्वारे जागतिक सायकल दिनानिमित्त कार्यालयात सायकलचा वापर करून येणा-या सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे पर्यावरण विभागातर्फे पुष्पगुच्छ देवुन सन्मान करण्यात आला.

जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत —माहितीस्तव सादर.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.
१. पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२. सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका